राज्यातील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम - २०२२

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

<u>निवडणूक प्राथम्य</u>

ई-मेलद्वारे

क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.५/का-६
नवीन प्रशासन भवन, पहिला माळा,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०८ जुलै, २०२२.

प्रति,

जिल्हाधिकारी,
पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती व बुलढाणा.

विषय :- राज्यातील ९२ नगर परिषदा व ४ नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२२.

संदर्भ :- १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०२/का-६, दि. ०६/०५/२०२२ व दि.०९/०६/२०२२ चे आदेश. (प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम)
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०३/का-६, दि. ०६/०५/२०२२ व दि.०९/०६/२०२२ चे आदेश. (प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम)
३) आयोगाचे समक्रमांकाचे दि. १०/०६/२०२२ चे आदेश. (मतदार यादी कार्यक्रम)

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ii) ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या अंतरिम आदेशामध्ये दिनांक १०/०३/२०२२ रोजीच्या टप्प्यापासून पुढील प्रक्रिया करण्याचे आदेश दिले आहेत;

त्यानुसार सोबतच्या **परिशिष्ट-२** मधील नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता आयोगाने दिलेल्या प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीच्या कार्यक्रमानुसार आरक्षणासहित अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला होता. त्यानुसार अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच मतदान केंद्रांची यादी दि.०९/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

iii) ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती **याचिका क्र.१९७५६/२०२१** व संलग्न याचिकांमध्ये दिनांक १७/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार आयोगाने जे जिल्हे/विभाग पावसामुळे (Monsoon) प्रभावित होणार नाहीत त्या ठिकाणी व तुरळक पर्जन्यमान असलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम तात्काळ राबवावा व आवश्यक असल्यास परिस्थितीनुरुप त्यात बदल करावेत असे आदेशित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाचे पालन करण्याकरिता भारतीय हवामान खात्यातील तांत्रिक/वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केल्यानंतर आयोगाने १७ जिल्ह्यांतील ७७ असे तालुके निवडलेले आहेत, ज्या ठिकाणी पावसामुळे निवडणूक कार्यक्रम बाधित होण्याची शक्यता कमी आहे. सबब, या १७ जिल्ह्यांमधील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे.

vi) त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, १७ जिल्ह्यांमधील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम राबविण्यात यावा असे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे. सदरच्या सार्वत्रिक निवडणुका मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील.

आदेश

१. **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट-२** मध्ये दर्शविलेल्या १७ जिल्ह्यांमधील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

२. राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. शासनाने सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १५ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ५१-१ ब मध्ये केलेली सुधारणा जी दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्यानुसार अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. (अध्यादेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

३. आता, या पत्रान्वये नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. तसेच सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका अधिनियमातील तरतुदीनुसार घेणे आवश्यक आहे.

४. परिशिष्ट-१ येथील निवडणूक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

५. **या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात यावी:-**

राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. त्यांनी http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी (Register) करुन घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. त्यावर स्वाक्षरी करुन ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

६. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणुकांकरिता नगर परिषदा/नगर पंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

७. सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषदा/नगरपंचायतींच्या प्रभाग रचना, आरक्षण व सोडत तसेच मतदार यादीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

८. नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

९. केंद्र व राज्य शासनाकडून कोविड-१९ च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना व दक्षता घेण्याबाबतच्या सूचना/निर्बंध लागू झाल्यास आयोगाचे दिनांक १७/०१/२०२२ च्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१०. सोबतच्या परिशिष्ट-१ नुसार निवडणूक कार्यक्रम मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार देण्यात येत आहे. तथापि, निवडणूक कार्यक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अतिवृष्टी, पूर इ. नैसर्गिक आपत्ती निवडणूक असलेल्या क्षेत्रात उद्भवल्यास त्याबाबतचा अहवाल तात्काळ आयोगास सादर करण्यात येईल, याची संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

११. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे:-

संकेत स्थळ : https://www.mahasec.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्रमांक (नगरपालिका शाखा) : ०२२-२२०४५०७५
दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा): ०२२-२२८८६९५०
ई-मेल : sec.mh@gov.in
सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, पुणे, नाशिक, औरंगाबाद व अमतरावती.
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक

१०) संबंधित नगर परिषदा व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी/प्रशासक
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
१३) उपायुक्त व सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१६) निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

# परिशिष्ट – १ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.५/का.६, दि.०८/०७/२०२२ सोबतचे सहपत्र.)

राज्यातील पर्जन्यमान कमी असलेल्या १७ जिल्ह्यांमधील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक सदस्य पदांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२२.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्याचा दिनांक | ०५/०७/२०२२ (मंगळवार) |
| २ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | २०/०७/२०२२ (बुधवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | २२/०७/२०२२ (शुक्रवार) सकाळी ११.०० ते २८/०७/२०२२ (गुरुवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | २२/०७/२०२२ (शुक्रवार) ते २८/०७/२०२२ (गुरुवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत) दि.२३/०७/२०२२ शनिवार, दि.२४/०७/२०२२ रविवार या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २९/०७/२०२२ (शुक्रवार) सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ६ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे | ०४/०८/२०२२ (गुरुवार) दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ६-अ | अपील असल्यास<br>(i) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक ०८/०८/२०२२ (सोमवार) पर्यंत. |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | १८/०८/२०२२ (गुरुवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १९/०८/२०२२ (शुक्रवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १० | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ मधील तरतुदीनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

| परिशिष्ट-२ | | | | |
|---|---|---|---|---|
| (आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.५/का-६, दि. ०८/०७/२०२२ सोबतचे सहपत्र.) | | | | |
| अ.क्र. | जिल्हा | तालुक्याचे नांव | नगरपरिषदांचे नांव | वर्गवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| "अ" वर्गातील नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२ | | | | |
| १ | जळगांव | भुसावळ | भुसावळ | अ |
| २ | पुणे | बारामती | बारामती | अ |
| ३ | सोलापूर | बार्शी | बार्शी | अ |
| ४ | जालना | जालना | जालना | अ |
| ५ | बीड | बीड | बीड | अ |
| ६ | उस्मानाबाद | उस्मानाबाद | उस्मानाबाद | अ |
| "ब" वर्गातील नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२ | | | | |
| ७ | नाशिक | नांदगाव | मनमाड | ब |
| ८ | नाशिक | सिन्नर | सिन्नर | ब |
| ९ | नाशिक | येवला | येवला | ब |
| १० | धुळे | शिंदखेडा | दोंडाईचा- वरवाडे | ब |
| ११ | धुळे | शिरपूर | शिरपूर- वरवाडे | ब |
| १२ | नंदुरबार | शहादा | शहादा | ब |
| १३ | जळगांव | अमळनेर | अमळनेर | ब |
| १४ | जळगांव | चाळीसगाव | चाळीसगाव | ब |
| १५ | अहमदनगर | कोपरगाव | कोपरगाव | ब |
| १६ | अहमदनगर | संगमनेर | संगमनेर | ब |
| १७ | अहमदनगर | श्रीरामपूर | श्रीरामपूर | ब |
| १८ | पुणे | खेड | चाकण | ब |
| १९ | पुणे | दौंड | दौंड | ब |
| २० | सातारा | कराड | कराड | ब |
| २१ | सातारा | फलटण | फलटण | ब |
| २२ | सांगली | ईस्लामपूर | ईस्लामपूर | ब |
| २३ | सांगली | विटा | विटा | ब |
| २४ | सोलापूर | अक्कलकोट | अक्कलकोट | ब |
| २५ | सोलापूर | पंढरपूर | पंढरपूर | ब |
| २६ | सोलापूर | माळशिरस | अकलूज (नवनिर्मित) | ब |
| २७ | कोल्हापूर | जयसिंगपूर | जयसिंगपूर | ब |
| २८ | औरंगाबाद | कन्नड | कन्नड | ब |
| २९ | औरंगाबाद | पैठण | पैठण | ब |
| ३० | बीड | अंबेजोगाई | अंबेजोगाई | ब |
| ३१ | बीड | माजलगाव | माजलगाव | ब |
| ३२ | बीड | परळी | परळी-वैजनाथ | ब |
| ३३ | लातूर | अहमदपूर | अहमदपूर | ब |
| ३४ | अमरावती | अंजनगाव | अंजनगाव-सुर्जी | ब |

| "क" वर्गातील नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | तालुक्याचे नांव | नगरपरिषदांचे नांव | वर्गवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३५ | नाशिक | चांदवड | चांदवड | क |
| ३६ | नाशिक | नांदगाव | नांदगाव | क |
| ३७ | नाशिक | बागलाण/सटाणा | सटाणा | क |
| ३८ | नाशिक | नाशिक | भगूर | क |
| ३९ | जळगांव | भुसावळ | वरणगांव | क |
| ४० | जळगांव | धरणगाव | धरणगाव | क |
| ४१ | जळगांव | एरंणडोल | एरंणडोल | क |
| ४२ | जळगांव | फैजपूर | फैजपूर | क |
| ४३ | जळगांव | पारोळा | पारोळा | क |
| ४४ | जळगांव | यावल | यावल | क |
| ४५ | अहमदनगर | जामखेड | जामखेड | क |
| ४६ | अहमदनगर | शेवगाव | शेवगाव | क |
| ४७ | अहमदनगर | देवळाली | देवळाली प्रवरा | क |
| ४८ | अहमदनगर | पाथर्डी | पाथर्डी | क |
| ४९ | अहमदनगर | राहता | राहता | क |
| ५० | अहमदनगर | राहुरी | राहुरी | क |
| ५१ | पुणे | खेड | राजगुरुनगर | क |
| ५२ | पुणे | खेड | आळंदी | क |
| ५३ | पुणे | इंदापूर | इंदापूर | क |
| ५४ | पुणे | पुरंदर | जेजुरी | क |
| ५५ | पुणे | पुंरदर | सासवड | क |
| ५६ | पुणे | शिरुर | शिरुर | क |
| ५७ | सातारा | माण | म्हसवड | क |
| ५८ | सातारा | रहिमतपूर | रहिमतपूर | क |
| ५९ | सातारा | वाई | वाई | क |
| ६० | सांगली | आष्टा | आष्टा | क |
| ६१ | सांगली | तासगाव | तासगाव | क |
| ६२ | सांगली | पलूस | पलूस | क |
| ६३ | सोलापूर | मोहोळ | मोहोळ | क |
| ६४ | सोलापूर | दुधनी | दुधनी | क |
| ६५ | सोलापूर | करमाळा | करमाळा | क |
| ६६ | सोलापूर | कुर्डुवाडी | कुर्डुवाडी | क |
| ६७ | सोलापूर | मैंदर्गी | मैंदर्गी | क |
| ६८ | सोलापूर | मंगळवेढा | मंगळवेढा | क |
| ६९ | सोलापूर | सांगोला | सांगोला | क |
| ७० | कोल्हापूर | गडहिंग्लज | गडहिंग्लज | क |
| ७१ | कोल्हापूर | कागल | कागल | क |

| "क" वर्गातील नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | तालुक्याचे नांव | नगरपरिषदांचे नांव | वर्गवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७२ | कोल्हापूर | शिरोळ | कुरुंदवाड | क |
| ७३ | कोल्हापूर | कागल | मुरगूड | क |
| ७४ | कोल्हापूर | हातकणंगले | वडगाव | क |
| ७५ | औरंगाबाद | गंगापूर | गंगापूर | क |
| ७६ | औरंगाबाद | खुल्ताबाद | खुल्ताबाद | क |
| ७७ | जालना | अंबड | अंबड | क |
| ७८ | जालना | भोकरदन | भोकरदन | क |
| ७९ | जालना | परतूर | परतूर | क |
| ८० | बीड | गेवराई | गेवराई | क |
| ८१ | बीड | धारुर | किल्ले धारुर | क |
| ८२ | उस्मानाबाद | भूम | भूम | क |
| ८३ | उस्मानाबाद | कळंब | कळंब | क |
| ८४ | उस्मानाबाद | मुरुम | मुरुम | क |
| ८५ | उस्मानाबाद | नळदुर्ग | नळदुर्ग | क |
| ८६ | उस्मानाबाद | उमरगा | उमरगा | क |
| ८७ | उस्मानाबाद | परंडा | परंडा | क |
| ८८ | उस्मानाबाद | तुळजापूर | तुळजापूर | क |
| ८९ | लातूर | औसा | औसा | क |
| ९० | लातूर | निलंगा | निलंगा | क |
| ९१ | अमरावती | दर्यापूर | दर्यापूर | क |
| ९२ | बुलढाणा | देऊळगाव राजा | देऊळगाव राजा | क |

| नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | तालुक्याचे नांव | नगरपंचायतींचे नांव | वर्गवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अहमदनगर | नेवासा | नेवासा | |
| २ | पुणे | आंबेगाव | मंचर (नवनिर्मित) | |
| ३ | पुणे | बारामती | माळेगाव बुद्रुक (नवनिर्मित) | |
| ४ | सोलापूर | मोहोळ | अनगर (नवनिर्मित) | |